महाराष्ट्र पोलीस

पोलीस उप आयुक्त वाहतुक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ५३ /२०२५ दि. २५/०३/२०२५

## "वाहतुक नियंत्रण अधिसुचना"

**ज्याअर्थी,** उल्हासनगर वाहतुक उप विभाग हद्दीत दि. ३०/०३/२०२५ रोजी सिंधी बांधवांचा 'चेटीचंड उत्सव' निमित्ताने भव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात येणार आहे. सदर मिरवणुकीच्या दरम्यान मिरवणूक मार्गावर वाहतूक कोंडी टाळण्यासाठी तसेच वाहतूक सुरळीत व सुनिश्चित होण्याकरीता आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी, मी, पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम. व्ही. ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद व No Parking –**

१) झुलेलाल मंदिर चौक – सादुबेला चौक – भारत चौक – शिरु चौक – नेहरु चौक – लिंक रोड – न्यु ईरा चौक – शिवाजी चौक – पवई चौक – हिराघाट – शास्त्री चौक या मिरवणूक मार्गावर सर्व प्रकारच्या वाहनांना पवई चौक पर्यंत **"प्रवेश बंद" व "No Parking"** करण्यात येत आहे.

**( वरील नमुद मार्गावरील वाहतुक तसेच रहदारी मिरवणुक संपे पर्यंत तात्पुरत्या स्वरूपात आवश्यक त्या पर्यायी मार्गाने वळविण्यात येईल.)**

**पर्यायी मार्ग –**

**अ) झुलेलाल मंदिर चौक** – झुलेलाल मंदिर मार्ग – भारत चौक – गोल मैदान – तसेच बिर्लागेट व इतर ठिकाणी जाणारी वाहतूक झुलेलाल चौक येथून खेमाणी, मच्छी मार्केट मार्गे इच्छित स्थळी जातील.

**ब) उल्हासनगर वाहतूक उप विभाग समोरील चौक** येथून भारत चौक मार्गे खेमाणी – धोबीघाट – झुलेलाल चौक मार्गे जाणारी सर्व प्रकारची वाहने उल्हासनगर वाहतूक उपविभाग कार्यालय येथून ओटी नं. १ मार्गे बाबा बसंतराम दरबार – मच्छी मार्केट मार्गे इच्छित स्थळी जातील.

**क) भारत चौक मार्गे** – गोल मैदान नेहरु चौक कडे जाणारी वाहतूक मच्छी मार्केट तसेच बाबा बेफिक्री चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.

**ड) नेहरु चौक मार्गे** – शिरु चौक तसेच खेमाणीकडे जाणारी वाहतुक हि मच्छिमार्केट व भारत चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.

**इ) शिवाजी चौकात**– अंबरनाथ शहराकडुन कल्याण बाजुकडे जाणारी सर्व प्रकारची वाहने फॉलवर लाईन मार्गे जवाहर हॉटेल – नेहरू चौक – गोल मैदान – मधुबन चौक – गुरूद्वारा चौक – शांतीनगर मार्गे इच्छित स्थळी जातील.

**ई) शास्त्री चौक मार्गे** – हिराघाटकडे जाणारी वाहतुक ही स्मशानभुमी चौक येथुन काजल पेट्रोलपंप मार्ग इच्छित स्थळी जातील.

**ऊ) कल्याण अंबरनाथ रोडने** अंबरनाथ दिशेने जाणारी वाहतूक होंडा शोरुम येथे डावे वळण घेवून डॉल्फीन क्लब – गुरुद्वारा चौक – मधुबन चौक – नेहरु चौक – जवाहर हॉटेल – फॉलवर लाईन मार्गे इच्छित स्थळी जातील.

**सदर वाहतूक नियंत्रण अधिसचना दि. ३०/०३/२०२५ रोजी सकाळी ११:०० ते २०:०० वा.पावेतो अंमलात राहील.** सदरची अधिसुचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका तसेच इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( पंकज शिरसाट )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

CamScanner

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.

२/- सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर,**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर

मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर

मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण.

मा. जिल्हाधिकारी, ठाणे.

मा. आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका.

**प्रत कार्यवाहीसाठी :-**

उप प्रादेशिक परिवहन अधिकारी ,कल्याण

विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, कल्याण/विठ्ठलवाडी

पोलीस उपायुक्त, परिमंडळ-४, उल्हासनगर व विशेष शाखा, ठाणे.

प्रत :- पोलीस उपायुक्त, आर्थिक गुन्हे,ठाणे शहर

२/- सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :- समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे

२/- सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :- सपोआ उल्हासनगर वाहतूक उपविभाग./प्रभारी अधिकारी, उल्हासनगर, विठठलवाडी, अंबरनाथ वाहतूक शाखा.

CamScanner